सकाळ | कोल्हापूर
कोल्हापूर, गुरुवार, ३० डिसेंबर २०२१

# TODAY

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

## » अवतीभवती

### क्रॉसकंट्रीसाठी विवेक मोरेची निवड



विवेक मोरे

गडहिंग्लज : येथील ओंकार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा खेळाडू विवेक नारायण मोरे याची १५ जानेवारी रोजी नागालँड येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी राज्य क्रॉसकंट्री संघात निवड झाली आहे. जत येथील राज्यस्तरीय स्पर्धेत त्याने चौथा क्रमांक पटकावला. या खेळाडूला संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. महेंद्र जाधव, श्रीमती कविता पोळ, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन तर सुरेश घुरे यांचे मार्गदर्शन मिळाले.